'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
Vol. 2 Issue. 1
ISSN :2348-7143 (Online)
Jan.- March - 2015

# उदात्त शैक्षणिक दृष्टीचे शिक्षणतज्ञ : प्राचार्य, डॉ. मा. य. वैद्य

**प्रा. ए. जी. नेरकर**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी,
म. स. गा. महाविद्यालय, मालेगाव कॅम्प.
जि. नाशिक, महाराष्ट्र, भारत.

**डॉ. बबनराव दौलत पवार**
संचालक,
का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन केंद्र,
धुळे, महाराष्ट्र, भारत.

प्राचार्य, डॉ. मा. य. वैद्य हे नाव शिक्षण क्षेत्रात विशेषत्वाने घेतले जाते. शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेचा काळ, या काळात कुलसचिव या नात्याने त्यांनी शिवाजी विद्यापीठाची धूरा नेटाने सांभाळली. प्राचार्य वैद्य यांनी कुशल प्रशासक म्हणून आपल्या कार्यशक्तीचा ठसा जसा कायमस्वरूपी विद्यपीठावर उमटवला तसेच शिक्षण क्षेत्रात उल्लेखलनीय काम केले. धुळे येथील अनेक सार्वजनिक, सामाजिक संस्थांतून त्यांनी जे कार्य केले तेही तितकेच मोलाचे आहे. पुरोगामी विचारसरणीच्या पाठपुरावा तोही सतत करीत राहणे ही सध्याच्या काळात म्हटलं तर अवघड बनत चाललेली गोष्ट पण प्राचार्य वैद्य यांनी या क्षेत्रातही भरीव असे काम केले. आधुनिक शिक्षणाचा सामाजिक संदर्भ प्राचार्य वैद्य यांच्या दृष्टीने विशेष महत्वाचा. केवळ इतिहासात रमणे हा प्रकारच नाही. शिक्षण, विशेषत: विज्ञानाधिष्ठित शिक्षण हे लेखकांच्या दृष्टीने संपूर्ण समाजाच्या उन्नतीचे एक जोरकस साधन, एक राजमार्ग. आजचा संदर्भ, आजची स्थिती याचे सतत भान बाळगून पूर्वस्थिती, इतिहास तपासणे, जीवन दृष्टीला पुरक असे अभ्याससूत्र. ५ सप्टेबर १९९४ रोजी लिहिलेल्या प्राक्थनातून हे सूत्र अधिक स्पष्ट होते. स्वातंत्र्य मिळून ६५ वर्ष झाली तरी बहूजन समाज शिक्षणापासून वंचितच आहे. त्यांच्या अंधश्रध्दाना ती कवटाळून बसला आहे. राजकारणात मिसळत गेलेला आहे. म्हणून विज्ञानाधिष्ठित शिक्षणाचा लाभ सर्व समाजाला झाला पाहिजे माणसांची मते मुक्त होवून अंधश्रध्दा व जातीचा आसरा घेण्याची कुपमंडकवृत्ती नष्ट झाली पाहिजे. म.फुले, राजर्षी शाहू, डॉ. आंबेडकर, न्या. रानडे, प्रिन्सीपल आगरकर, नामदार गोखले इत्यादींनी दाखवून दिलेल्या संपूर्ण समाजाच्या उन्नतीच्या मार्गाचा आज ही संदर्भ आहे हे जाणने जरूर आहे.

प्राचार्य श्री. म. वि. फाटक (चाळीसगांव महाविद्यालय) व नानासाहेब हे दोघे सच्चे मित्र होते. ते नानासाहेबांच्या वागण्या - बोलण्याविषयी लिहीतांना म्हणतात की, आम्हा दोघांत विद्येचे हीत, हेतू व समान उदिद्ष्टे असले तरी उपायोजनांत फरक पडे. विद्यार्थ्यांना मी फार रागवणारा, शिस्तप्रिय व कडक वाटत असे तर नानासाहेब फार प्रेमळ, चंदनाहूनही शितल वाटत. प्राचार्य नानासाहेब शिस्तप्रिय वा कडक नव्हते. हा त्याचा अर्थ नाही, पण सामान्यत: समजावून घेणे, सांभाळून घेणे ही त्यांची जीवन निष्ठा असल्यामुळे त्यांचा राग सहसा प्रकट होत नसे. त्यामुळे त्यांच्या चांगलेपणाचा फायदा काही वेळा विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना ही मिळत असे. प्राचार्य नानासाहेबांच्या यशाचे

आणि विद्यार्थी प्रियतेचे खरे रहस्य माझ्या मते त्यांचा समजुतदारपणा आणि मुख्यत्वे विद्यार्थ्यांबद्दल कनवाळुपणांत आहे. **ज्यासी आपंगिता नाही त्यासी म्हणे जो आपुले.** ही उक्ती नानासाहेबांमध्ये अनेकदा पहावयास मिळाली.

प्राचार्य डॉ. देवरे धनसिंग भगवान या एका गरीब होतकरू विद्यार्थ्याला जो मदतीचा हात दिला ते आयुष्यबर नानासाहेबांना विसरले नाहीत. डॉ. देवरेनी त्यांच्या साक्षात्कारी **पाउलखुणा** या पुस्तकांत नानांच्या कृतज्ञतेविषयी तेथे कर जुळती नावाचा लेख लिहून परत फेड केली आहे. या लेखाच्या सुरूवातीलाच तो यशाचा महामंत्र म्हणून माणसानं माणसाशी माणूसकीनं वागांव आणि चारचौघात प्रेम संपादन करावं ही विश्वव्यापक मानवता ज्याच्या विचार-आचाराने अधोरिखत होते, त्यांच्यापुढे नतमस्तक होण्यातच धन्यता. मा. य. तथा नानासाहेब वैद्य : जीवनाचा शिल्पकार अशा शब्दात आपले मनोभाव व्यक्त करतात. याच पुस्तकाला मनोगतपर दोन शब्द लिहितांना प्राचार्य, डॉ. देवरे धनसिंग भगवान विषयी नानासाहेब म्हणतात, श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या शिक्षण प्रेमी संस्थाचालकांनी धुळे येथे पहिले कॉलेज काढले आणि या पहिल्या कॉलेजचे पहिले प्राचार्य म्हणून नानासाहेब काम पाहत असतांना धनसिंग देवरे नावाचा एक दुबळ्या देहाचा, गरीबीतला, एस. एस. सी. पास झालेला मुलगा नानासाहेबांच्या पुढे उभा राहिला. या दुसऱ्या मुलाची घरची परिस्थीती प्रतिकुल होती. नानांनी याला काही सवलती वगैरे दिल्या असतील, परंतू या दुबळ्या माणसांत असा काही उर्जेचा जबरदस्त स्त्रोत होता की अनेक अडथळयांवर मात करून तो बी. ए., एम.कॉम (अर्थशास्त्र कॉमर्स) पी.एचडी. झाला. प्राध्यापक झाला. यशस्वी प्राचार्य झाला. आणि मोठया कौतुकाने नमूद करावयाची बाब अशी की त्या हार्ट पेशंटने प्राचार्य म्हणून निवृत्त झाल्यावर दृष्ट लागण्यासारखी कामगिरी केली, दोन कॉलेज काढलेत. नंतर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या तंत्रशिक्षण संस्थेचा ते आधारवड झाले. नानासाहेबांच्या या शैक्षणिक मदतीला निश्चितच सलाम करावासा वाटतो.

प्राचार्य, डॉ. नानासाहेब वैद्य यांनी **वाघिणीचे दूध** नावाचे पुस्तक लिहीले. वाघिणीचे दूध म्हणजे इंग्रजी भाषा. ही भाषा सर्व विद्यार्थ्यांना अवगत झाली पाहिजे. परंतु वाघिणीचे दूध म्हणजे इंग्रजी भाषाअसा मर्यादीत अर्थ लेखकाला मान्य नाही. लेखकाला अभिप्रेत असलेल्या विविध अर्थछटा या पुस्तकात विखुरलेल्या आहेत. उदा. नवविद्या, नवशिक्षण, स्वातंत्र्यप्रियता, समता, बंधुत्व, स्त्री प्रतिष्ठा यासारखी नवी जीवनमूल्ये विज्ञाननिष्ठा, वैज्ञानिक दृष्टीकोन, ऐच्छिक प्रगती, नीती एक ऐहिक कल्पना, स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता इत्यादी वाघिणीच्या दुधाविषयीची लेखकाची दृष्टी अशी व्यापक असून त्यात मुक्त प्रशिक्षण प्रक्रियेला केंद्रिय स्थान आहे. मुक्त शिक्षण म्हणजे सर्वांना उपलब्ध असणारे शिक्षण तसेच प्रत्येकास स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता प्रदान करणारे शिक्षण, महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना शिक्षणविषयक जाणीव आकारास येत असल्याने लेखकाचे व्यवसाय क्षेत्र ही स्वाभाविकरित्या निश्चित आहे. त्यांच्या प्राचार्य पदाच्या दीर्घ काळात गरीब विद्यार्थ्यांना विविध प्रकारे शिक्षणासाठी मदत करणे व स्वतंत्रपणे विचार करण्यासाठी लाजऱ्या बुजऱ्या सामान्य विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहणे या दोन गोष्टी अगदी सहजपणे घडत आल्या.

१८१८ मध्ये पेशवाई नष्ट झाल्यावर जी इंग्रजी विद्या उपलब्ध झाली त्या नवविद्येला, नवविचाराला, विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी वाघिणीचे दूध म्हटले. इतिहासकार म्हणतात, त्या काळात इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज असे अठरा टोपीकर येथे आले. आणि त्या सर्वात श्रेष्ठ ते इंग्रज व त्यांची ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनी. म्हणजेच त्याच काळात युरोपच्या सान्निध्यात आलो. श. द. जावडेकरांनी आपल्या आधुनिक भारत या ग्रंथात म्हणूनच म्हटले आहे की, १९ व्या शतकांत भारतात विशेषत: महाराष्ट्रात मिल्ल व स्पेन्सर यांचे तत्वज्ञान आले व टिळक, आगरकराच्या पिढीने ते पचविले आज या विसाव्या शतकाच्या त्याच युरोपातून मार्क्स, लेनिनचे तत्वज्ञान येत असून ते पचविण्याची जबाबदारी आपल्या पिढीची आहे.

मिल्ल, स्पेन्सर्सचे तत्वज्ञान मुख्यत: व्यक्तीवादी, व्याक्तिस्वातंत्र्यवादी तर या उलट मार्क्सवादी लेनीनचे तत्वज्ञान समाजवादी, एक राष्ट्रवादी तर आंतरराष्ट्रीयवादी एक लोकशाही तर दुसरे बहूजनहुकूमशाहीवादी. युरोपातच व्यक्तीवादी, राष्ट्रवादी, तत्वज्ञानाच्या मर्यादा उघड झाल्या म्हणून नवे समाजवादी तत्वज्ञान पुढे आले. लेखकाला युरोपातील या प्रबोधन युगाचे व तेथील क्रांतीचे व्यवस्थित भान आहे. नवविद्या व स्वतंत्रपणे विचार करायला लावणारे नवे इंग्रजी शिक्षण या दोन शब्दांतून नवजगनिर्मीतीची ती युरोपीय विराट प्रक्रिया लेखक सहजपणे प्रकट करतात. लेखकाच्या शब्दात नवविद्यारूपी वाघिणीच्या दूधाच्या प्रशासनाने लोकहितवादी रानडे, आगरकर, गोखले, महर्षी कर्वे, डोंगराएवढी पांढरपेशी मंडळी मोठया संख्येने निर्माण झाली. त्यांनी समाजातील अन्याय विषमते विरूध्द आघाडी उघडली. महात्मा फुले, डॉ.भाऊराव पाटील, डॉ.आंबेडकर हे तर अज्ञान अंधकारात खितपत बहूजन समाजातील हया तळाच्या दलीत समाजात जन्मास आलेल्या व्यक्तींनी आक्रमक भूमिका घेवून पाढंरपेशांच्या वर्चस्वाविरूध्द बंड पुकारून बहुजन समाज व दलितांची अस्मिता जागत केली. सयाजीराव महाराज, राजर्षी शाहू हे इंग्रज गुरूच्या तालिमात तयार झाले. संस्थानिक राजे म्हणजे इंग्रजांनी येथील बहुजन समाजाला दिलेली मौल्यवान देणगी होय. जे किमान दिड दोन हजार वर्ष घडलेच नाही. जे इंग्रजांच्या आगमनाने घडले. राजे, महाराजे, नवाब यांच्या अनागोंदी कारभाराच्या जागी इंग्रजानी न्यायदृष्टीस सुव्यवस्थित शासनपध्दती आणली. विज्ञानाधिष्टीत शिक्षणाची दारे उघडल्याने इंग्रजी सत्तेचे संरक्षण आम जनतेला आवश्यक आहे. याचे सुधारकांना भान होते. या सत्तेचा अनुनय होता. तर व्यापक राष्ट्रउन्नतीच्या अटीचे भान होते. जहालांचे अग्रणी लोकमान्य टिळक यांनाही १९१८ मधील मुलाखती नुसार अधिकारांमध्ये वाढ हवी होती. इंग्रजी सत्तेचा पडाव अपेक्षित होता. हे य. दि. फडके यांनी दाखवून दिले असल्याची नोंद पुस्तकात आहेच.

ब्रिटीश राज्यकर्त्यांनी समतेच्या नवमूल्यांची विज्ञाननिष्ठ शिक्षणाद्वारे ओळख करून दिली. तेव्हा हे शिक्षण सर्वांना अगदी अस्पृश्य मानल्या गेलेल्या दलितांनाही खुले झाले. बहूजन समाजातील गरीबांनी अज्ञान व दारिद्रय यातून वर येण्यासाठीच इंग्रज येथे आले व त्यांचे धोरणच सहाय्यभूत ठरले. हे प्राचार्य मा. य. वैद्य यांचे मी संदिग्ध व प्रामाणिक मत सर्वांनीच मान्य केले. इतके वस्तूनिष्ठ सत्य आहे. सामाजिक बाबतीत परंपरावादी, धार्मिक बाबतीत प्रतिगामी, शिक्षणाच्या बाबतीत उदासिन आणि राजकिय व आर्थिक बाबतीत निष्क्रिय किंवा अकार्यक्षम बनलेल्या महाराष्ट्रीय

जनतेला जाग आणण्यासाठी ज्या महापुरूषांनी प्रगल्भ प्रज्ञावंतांनी शर्थीचे प्रयत्न केले. त्यांच्या ब्रिटीशांविषयीच्या कृतज्ञता भावनेवर आधारितअसल्या तरीही अराष्ट्रीयत्वाचा अथवा विदेशी धार्जिणेपणाचा शिक्का मारणे खरोखरीच कृतघ्नपणाचे व सर्वांवरच अन्याय कारक ठरणार आहे. ब्रिटीशांनी एकछत्री अंमल निर्माण केल्यामुळे एक राष्ट्रीयत्त्वाची भावना व संकल्पना स्वतंत्र भारताच्या रूपाने साकार होण्याची प्रक्रिया फलद्रप ठरू शकली हे तर सर्वांना मान्यच करावे लागेल.

**संदर्भ :**


१. तळ उन्हातले - गुरूकुल प्रतिष्ठान प्रकाशन पुणे. आवृत्ती १, १० मार्च २००२.

२. तळ उन्हातले - गुरूकुल प्रतिष्ठान प्रकाशन पुणे. आवृत्ती २, (सन २००५)

३. शुभेच्छा सुमनांजली व्यक्तिदर्शन - डॉ. दादासाहेब घोगरे यांनी नानासाहेबांच्या सत्कार प्रसंगी संपादित केलेले लेख (८ ऑगस्ट १९६३ : जनता प्रिंटिंग प्रेस, धुळे.)